POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-५३ ● मुंबई, गुरुवार,२५ सप्टेंबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

Sharad Navratri Colors 202

| | |
|---|---|
| Sep 22, Monday | White |
| Sep 23, Tuesday | Red |
| Sep 24, Wednesday | Royal Blue |
| Sep 25, Thursday | Yelllow |
| Sep 26, Friday | Green |
| Sep 27, Saturday | Grey |
| Sep 28, Sunday | Orange |
| Sep 29, Monday | Peacoc |
| Sep 30, Tuesday | Pink |



## सोलापूर जिल्ह्यात शोध व बचाव कार्यास मिळणार गती

## अन्य जिल्ह्यातून मनुष्यबळासह मागविल्या ११ बोटी

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून सातत्याने पाऊस व अतिवृष्टी होत आहे. तसेच उजनी धरणातून भीमा नदीत तसेच सीना कोळेगाव प्रकल्पातून सीना नदीत मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सोडला जात असल्याने माढा, करमाळा, मोहोळ, पंढरपूर, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर या तालुक्यातील अनेक गावे पुराच्या पाण्यात अडकलेली आहेत.

जिल्हा प्रशासनाच्या वतीने या सर्व नागरिकांना सुखरूप बाहेर काढण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. परंतु अतिरिक्त बचाव पथके आवश्यक असल्याने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी रात्रीपासून अन्य जिल्ह्यातील जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा करून अकरा बोटी पुरेशा मनुष्यबळासह उपलब्ध करून घेतल्या असून त्या घटनास्थळी दाखल होऊन बचाव कायार्ला अधिक गती मिळणार आहे. यामध्ये कोल्हापुर 3, लातूर 1, सांगली 3, इंदापूर 2, नांदेड 2 अशा 11 बोटी मागवण्यात आलेल्या आहेत. त्याप्रमाणेच माढा तालुक्यातील दारफळ येथे पुराच्या पाण्यात अनेक नागरिक अडकले असून एनडीआरएफ टीमचे पथक बचावासाठी गेले होते परंतु पुराच्या पाण्याचा प्रवाह खूप गतीने येत असल्याने त्यांना त्या नागरिकांना सुखरूप ठिकाणी बाहेर काढणे शक्य झालेले नव्हते त्यामुळे सैन्य दलाची चर्चा करून जिल्हा प्रशासनाने त्या नागरिकांना एअरलिफ्टद्वारे सुखरूप ठिकाणी बाहेर काढण्यासाठी प्रयत्न केले आहेत. लवकरच आमीर्चे हेलिकॉप्टर पथक दारफळ येथे पोहोचून सर्व नागरिकांना बाहेर काढण्याची कार्यवाही करतील.

महाराष्ट्र राज्य नियंत्रण कक्षाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी एनडीआरएफचे आणखी एक पथक बचाव कायार्साठी मिळवले असून ते पुढील दोन तासात माढा येथील बचाव कार्यात सहभाग घेणार असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाच्या वतीने देण्यात आली आहे.

संपूर्ण सोलापूर जिल्हा प्रशासन तसेच तालुकास्तरीय प्रशासकीय यंत्रणा ही महापूराची परिस्थिती हाताळण्यासाठी रात्रंदिवस परिश्रम घेत आहेत. तरी नागरिकांनी जिल्हा नियंत्रण कक्षाच्या 0217/2731012 या क्रमांक वर संपर्क साधून अतिवृष्टी व पूर परिस्थितीच्या अनुषंगाने माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे.




**जिल्ह्यात शोध व बचाव कायार्साठी एकूण ९ टीम कार्यरत**

सोलापूर जिल्ह्यात पूर परिस्थितीमध्ये शोध व बचाव कायार्साठी एकूण ९ टीम कार्यरत आहेत. त्यापैकी सोलापूरच्या ५ टीम, कोल्हापूरच्या २ टीम (त्यापैकी एक कार्यरत आहे एक मदत कायार्साठी पोहोचत आहे) व ठऊफऋची देखील दोन टीम पैकी एक कार्यरत आहे व दुसरी टीम पोहोचत आहे. जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून पाऊस, अतिवृष्टी होत आहे, तसेच भीमा व सीना नदीला महापूर आलेला आहे. त्यामुळे जिल्ह्यात आपत्तीचे परिस्थिती असून शासकीय विभाग प्रमुख तसेच त्यांच्या अधिनस्त अधिकारी कर्मचारी यांनी मुख्यालय सोडू नये, असे आदेश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले आहेत.

## गरद (ब्राऊन शुगर) विक्रीसाठी जवळ बाळगणारा इसम अटकेत! आचोळे पोलीस ठाण्याची मोठी कारवाई

■ विरार । प्रतिनिधी,

ब्राऊन शुगर (गरद) हा अंमलीपदार्थ विक्रीकरीता जवळ बाळगणाऱ्या ईसमास अटक -आचोळे पोलीस ठाणेची कामगीरी. अधिक माहितीनुसार दिनांक १८/०९/२०२५ रोजी मा. वरिष्ठांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे पोलीस ठाणे हद्दीमध्ये अंमली पदार्थ विक्री व सेवन करणारे इसम, बांगलादेशी नागरीकांचे वास्तव्य तसेच नायजेरीयन/ आफ्रिकन नागरीकांकडुन होणाऱ्या ड्रग्ज विक्रीबाबत आचोळे पोलीस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांना कारवाई करण्याच्या सुचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार पोलीस ठाणे हद्दीमध्ये गस्त करतांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, नालासोपारा रेल्वे स्टेशनच्या पुर्व बाजुस कॅपीटल मॉल जवळ, एक ब्राऊन शुगर (गरद) या अंमलीपदाथार्ची विक्री करण्यासाठी येणार आहे. मिळालेल्या माहिती बाबत गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या अधिकारी यांनी मा. वरिष्ठांना अवगत करुन वरिष्ठांचे परवाणगीने नमुद इसमावर कारवाई करण्यासाठी सापळा रचला.



दिनांक १८/०९/२०२५ रोजी दुपारच्या सुमारास विवा टाऊनशिप बिल्डींग, कॅपीटल मॉल जवळ, स्टेशन रोड, नालासोपारा पु. येथे एक संशयीत रित्या उभा व कोणाचीतरी वाट पाहत असल्याचे दिसुन आले. त्यावेळी गुप्त बातमीदारा करवी सदर ईसमाबाबत खात्री करुन त्यास गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या अधिकारी अंमलदार त्यास ताब्यात घेतले. नमुद इसमाचा अंगझडती घेतली असता त्याचेकडे ५६.०४ ग्रॅम इतक्या वजानाची ब्राऊन शुगर (गरद) हा अंमलीपदार्थ मिळुन आला. सदर वेळी त्यास त्याचे नाव पत्ता विचारता त्याने समसाद जमसेद आली वय-२४ वर्षे, व्यावसाय-रिक्षाचालक, राहणार आर. के. कॉलेज जवळ, नालासोपारा पुर्व ता. वसई जि. पालघर मुळ रा. पाडली गुजर, स्टेशन-रुडकी, जि-हरिद्वार, राज्य-उत्तराखंड असा सांगीतले त्यास पुढील कारवाई करीता ताब्यात घेवुन त्याच्या कडुन ११,७०,८००/-रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन त्याचेवर आचोळे पोलीस ठाणे, दिनांक १९/०९/२०२५ रोजी गुन्हा दाखल केला आहे.

सदर गुन्ह्याचा तपास करीत असताना आरोपी याचे पोलीस कोठडीमध्ये त्याची घर झडती घेतली असता त्याचे राहते घरामध्ये २८ ग्रॅम इतक्या वजानाची ब्राऊन शुगर (गरद) हा अंमलीपदार्थ मिळुन आला. तरी नमुद अटक आरोपी याचे कडुन एकुण ८४.०४ ग्रॅम इतक्या वजानाची १७,४०,०००/-रुपये किंमतीची ब्राऊन शुगर (गरद) हा अंमलीपदार्थ मिळून आला सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोउनि/गुरुदास मोरे हे करीत आहेत.

सदरची कामगिरी मा. श्री. निकेत कौशिक, पोलीस आयुक्त, मा. श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, मा. श्रीमती पौर्णिमा चौगुले श्रींगी, पोलीस उप आयुक्त परिमंडळ २, मा.श्री. उमेश माने-पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त तुळींज विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. सुजितकुमार पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, आचोळे पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोउनि/मंगेश वडणे, पोउनि/गुरुदास मोरे, सफौ / दत्तात्रय दाईंगडे, पोहवा/शंकर शिंदे, पोहवा/निखील चव्हाण, पोहवा/विनायक कचरे, पोहवा/ अमोल सांगळे, पोअं/मोहनदार बंडगर, पोअं/मनोज पाईकराव, पोअं/गोविंद गुट्टे, पोअं/लोकेश कुवर, मपोशि/सिगमा पालशेतकर यांनी यशस्वी रित्या केलेली आहे.

## मुंबईची पाणीचिंता मिटली; ११ महिन्याचा पाणीसाठा



■मुंबई । प्रतिनिधी,

यंदा मुंबईला पाणीपुरवठा करणारे सर्व तलाव सप्टेंबर महिना संपत आला तरी काठोकाठ भरलेले आहेत.सर्व तलावांत १४ लाख ४० हजार २२० दशलक्ष लिटर इतका पाणीसाठा आहे.

हे पाणी ऑगस्ट २०२६ पर्यंत म्हणजेच पुढील ११ महिने पुरणार आहे. त्यामुळे मुंबईकरांची पाण्याची चिंता मिटली आहे. मुंबई शहराला दररोज सरासरी ३,९५० दशलक्ष लिटर म्हणजे महिन्याला १ लाख २० हजार दशलक्ष लिटर पाण्याचा पुरवठा केला जातो. त्याशिवाय काही ठाणे व भिवंडी शहराला ही पाणीपुरवठा केला जातो.त्यामुळे सध्याचा पाणीपुरवठा हा कोणतीही कपात न करता किमान ११ महिने पुरेल इतका आहे. त्यामुळे मुंबईकरांना ऑगस्ट २०२६ अखेरपर्यंत पाणीटंचाईची भीती नसल्याचे एका वरिष्ठ अभियंत्याने सांगितले.


मुंबई शहराला ठाणे जिल्ह्यातील तानसा , मोडक सागर, मध्य वैतरणा व भातसा, नाशिक जिल्ह्यातील अप्पर वैतरणा व नॅशनल पार्कमधील तुळशी व विहार तलावांतून पाणीपुरवठा होत असतो.या तलावांच्या पाणलोट क्षेत्रात सप्टेंबर अखेरपर्यंत १४ लाख दशलक्ष लीटरपेक्षा जास्त पाणी शिल्लक राहिल्यास ऑगस्टपर्यंत पाण्याची कमतरता भासत नाही.

## पहलगाम दहशतवादी हल्लाप्रकरणी मोठं यश, दहशतवाद्यांना मदत करणारा मोहम्मद कटारिया अटकेत, श्रीनगर पोलिसांची कारवाई

■श्रीनगर। प्रतिनिधी,

श्रीनगरः जम्मू काश्मीरच्या पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यावेळी दहशतवाद्यांना मदत करणाऱ्याला पोलिसांनी अटक केली आहे. श्रीनगर पोलिसांनी अटक केलेल्या व्यक्तीचं नाव मोहम्मद यूसुफ कटारिया आहे. 22 एप्रिलला त्यानं लष्कर-ए-तोयबाच्या दहशतवाद्यांची मदत केली होती. श्रीनगर पोलिसांनी त्याला अटक करुन कोर्टात हजर केल्यानंतर त्याला न्यायालयीन कोठडी देण्यात आली आहे.

मोहम्मद यूसुफ कटारिया हा लष्कर-ए- तोयबा- चा दहशतवादी अटक केली आहे. ज्याच्यावर बैसरन घाटीत 26 भारतीय पर्यटकांच्या हत्येमध्ये सहभागी असलेल्या दहशतवाद्यांना मदत केल्याचा आरोप आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसा ऑपरेशन महादेवच्या दरम्यान जप्त केलेल्या शस्त्रांच्या आणि इतर साहित्याच्या विश्लेषणानंतर ही अटकेची कारवाई करण्यात आली. आमच्या चौकशीत याला दुजोरा मिळाला की दहशतवाद्यांच्या दळणवळणात मदत आणि त्यांना सुविधा पुरवण्यात कटारियाची महत्त्वाची भूमिका होती. दक्षिण काश्मीरमध्ये दहशतवाद्यांच्या नेटवर्क विरोधात मोठं यश मिळाल्याचं अधिकाऱ्यांनी म्हटलं. कटारियाच्या सहकाऱ्यांची ओळख पटवणे आणि लष्कर-ए-तोयबा (टीआरएफ)शी संबंधित नेटवर्क उद्धवस्त करण्यासाठी पुढील चौकशी सुरु आहे. पोलिसांनी दहशतवाद्यांचं मॉड्यूल कमजोर करण्यासाठी आणि जम्मू काश्मीरमध्ये शांतता सुनिश्चित करण्यासाठी अभियान सुरु ठेवणार असल्याचं पोलिसांनी सांगितलं. मोहम्मद यूसुफ कटारिया पहलगाममध्ये स्थानिक मुलांना शिकवण्याचं काम करायचा. मात्र, काही महिन्यांपूर्वी तो दहशतवाद्यांच्या संपर्कात आला आणि त्यांना मदत करु लागला होता.




पहलगामच्या बैसरन घाटीत 22 एप्रिलमध्ये दहशतावाद्यांनी धर्म विचारुन 26 पर्यटकांची हत्या केली होती. पाकिस्तानातील टीआरएफ संघटनेनं या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली होती. या दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारतानं ऑपरेशन सिंदूर राबवत पाकिस्तानातील दहशतवादी ठिकाणांवर हल्ले केले होते. ज्यामध्ये 100 हून अधिक दहशतवाद्यांचा मृत्यू झाला होता. यानंतर 28 जुलै रोजी ऑपरेशन महादेव अंतर्गत सैन्यदलानं दहशतवादी हल्ल्यातील लष्करच्या तीन दहशतवाद्यांचा खात्मा केला होता. या हल्ल्यानंतर भारतीय सुरक्षा दलांनी 'ऑपरेशन महादेव' अंतर्गत अनेक दहशतवाद्यांचा खात्मा केला. त्यात पहलगाम हल्ल्यातील मुख्य दहशतवाद्यांचाही समावेश होता. तसेच, भारताने पाकिस्तानवर 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत हवाई हल्ले केले, ज्यात दहशतवादी तळ उद्धवस्त करण्यात आले. मोहम्मद कटारियाच्या अटकेमुळे दहशतवाद्यांच्या स्थानिक नेटवर्कला मोठा धक्का बसला आहे. त्याच्या चौकशीतून हल्ल्याबाबत आणखी महत्त्वपूर्ण माहिती समोर येण्याची शक्यता आहे.

यापूर्वी, राष्ट्रीय तपास संस्थेने या हल्ल्यातील दहशतवाद्यांना आश्रय देणाऱ्या परवेझ अहमद जोथर आणि बशीर अहमद जोथर या दोघांनाही अटक केली आहे.

## सीबीएसईकडून दहावी आणि बारावीच्या संभाव्य वेळापत्रक जाहीर, यंदा परीक्षा दोन टप्प्यात होणार




■ नवी दिल्ली। प्रतिनिधी,

केंद्रीय माध्यमिक शिक्षण बोडार्नं 2026 साठी दहावी आणि बारावीच्या संभाव्य तारखा जाहीर केल्या आहेत. सीबीएसईनं दहावी आणि बारावीचं संभाव्य वेळापत्रक जारी केलं आहे. बोर्डाच्या अधिकृत नोटीसनुसार पहिल्या टप्प्यातील 17 फेब्रुवारी 2026 ला परीक्षा सुरु होईल. दुसऱ्या टप्प्यातील परीक्षा 15 जुलै 2026 ला संपेल. या वेळी मुख्य परीक्षेसह विद्यार्थ्यांसाठी विशेष परीक्षा आयोजित केल्या जाणार आहे.दहावीची दुसरी परीक्षा आणि बारावीची पुरवणी परीक्षा देखील आयोजित केली जाणार आहे. सीबीएसईच्या संभाव्य डेटशीट नुसार, दहावीच्या बोर्ड परीक्षेचा पहिला टप्पा 17 फेब्रुवारीला सुरु होईल तो 6 मार्च 2026 ला संपेल. दहावीची दुसरी बोर्ड परीक्षा 15 मे रोजी सुरु होईल ती 1 जूनला संपेल. बारावीची बोर्ड परीक्षा 17 फेब्रुवारीला सुरु होईल ती 9 एप्रिल 2026 ला संपेल.

सीबीएसईच्या परिपत्रकानुसार भारतात जवळपास 45 लाख विद्यार्थी या परीक्षांना बसतील. देशातील 2024 विषयांसह विदेशातील 26 देशात परीक्षा आयोजित केली जाणार आहे. बोडार्नं हे देखील सांगितलं आहे. हे वेळापत्रक संभाव्य आहे. शाळांकडून विद्यार्थ्यांची अंतिम यादी प्रस्तुत केल्यानंतर अंतिम वेळापत्रक जारी केलं जाणार आहे.

सीबीएसईनं हे स्पष्ट केलं की परीक्षानंतर मूल्यांकन प्रक्रिया वेळेवर सुरु केली जाणार आहे. प्रत्येक विषयाच्या परीक्षेनंतर दहा दिवसांनी उत्तर पत्रिका तपासणी सुरु होईल आणि ती 12 दिवसात संपणार आहे.उदा. 12 वीच्या भौतिकशास्त्राचा पेपर 20 फेब्रुवारीला झाला तर उत्तर पत्रिका तपासणी 3 मार्चला सुरु होईल आणि 15 मार्चला संपेल.

बोडार्नं संभाव्य वेळापत्रक विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी जारी केलं आहे. परीक्षांची तयारी सुरु करण्यासाठी आणि प्रात्याक्षिक परीक्षांच्या तयारीसाठी विद्यार्थ्यांना याचा फायदा होणार आहे.

## कांदिवलीत गॅस सिलिंडरचा स्फोट; ७ जण गंभीर जखमी !

■ सोलापूर। प्रतिनिधी,

मुंबई : मुंबईच्या कांदिवली (पूर्व) परिसरात गॅस सिलिंडरचा स्फोट होऊन एका दुकानात आग लागल्याची घटना घडली. या आगीत सहा महिला आणि एक पुरुष गंभीर भाजले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आग सकाळी ९.०५ वाजता राम किसन मेस्त्री चाळ, मिलिटरी रोडवरील आकुर्ली मेंटेनन्स चौकीजवळ असलेल्या एका दुकानात लागली. दुकानातील विद्युत वायरिंग आणि इलेक्ट्रिक उपकरणांमुळे आग गॅस स्टोव्ह अशा वस्तूंमध्ये पसरली असे अधिकाऱ्यांनी सांगितले.



या दुर्घटनेत रक्षा जोशी (४७), दुर्गा गुप्ता (३०) आणि पूनम (२८) या महिल ८५ ते ९० टक्के भाजल्या असून त्यांना तातडीने बीडीबीए रुग्णालयात दाखल करण्यात आले. नंतर अधिक उपचारासाठी कस्तुरबा रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

इतर जखमींची माहितीः

नीतू गुप्ता (३१) - ८०% भाजल्या

जानकी गुप्ता (३९) - ७०% भाजल्या

शिवानी गांधी (५१) - ७०% भाजल्या

मनाराम कुमकत (५५) - ४०% भाजले

घटनास्थळी तत्काळ चार अग्निशमनगाड्या व इतर यंत्रणा दाखल झाली. आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले आहे, असे अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

## वैमानिकांना दोषी धरणे दुर्दैवी; सर्वोच्च न्यायालयाचे निरीक्षण

■ नवी दिल्ली। प्रतिनिधी,

अहमदाबादमध्ये एअर इंडिया च्या विमानाला झालेल्या भीषण अपघातात प्राथमिक चौकशीच्या आधारे वैमानिकांना दोषी धरणे दुर्दैवी गोष्ट आहे, अशा शब्दात सर्वोच्च न्यायालयाने एका जनहित याचिकेवरील सुनावणीदरम्यान नाराजी व्यक्त केली. १२ जून रोजी अहमदाबादच्या विमानतळावरून लंडनसाठी उड्डाण केल्यानंतर काही सेकंदात एअर इंडियाचे बोईंग विमान कोसळले होते. या भीषण अपघातात वैमानिक,प्रवासी आणि विमान कोसळलेल्या ठिकाणी असलेले असे एकूण २६५ लोक मृत्यूमुखी पडले. या घटनेला शंभर दिवस उलटून गेल्यानंतर अद्याप केवळ अपघातासंबंधीचा प्राथमिक अहवाल आला आहे. या अहवालात अपघाताचे नेमके कारण आणि भविष्यात अशा चुका टाळण्यासाठी काय उपाययोजना करणे आवश्यक आहे, यावर काहीही भाष्य करण्यात आलेले नाही. विमानातील इंधनाचा स्वीच रन ऐवजी कट ऑफ वर ठेवण्यात आला, असा वैमानिकांकडे बोट दर्शवणारा उल्लेख या अहवालात करण्यात आला आहे. प्रवाशांच्या हवाई सुरक्षेबाबत काम करणाऱ्या सेफ्टी मॅटर्स फाऊंडेशन (एसएमएफ)या स्वयंसेवी संस्थेने यासंबंधी सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे. या याचिकेवर आज न्या. सूर्य कांत आणि न्या. एन के सिंह यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. त्याप्रसंगी न्यायालयाने प्राथमिक चौकशी अहवालात वैमानिकांना जबाबदार धरण्यावर तोंडी निरीक्षण नोंदवून विमान अपघात तपास संस्थेचे (एएआयबी) महासंचालक आणि नागरी विमान उड्डाण खात्याचे महासंचालक यांना नोटीस पाठवून स्पष्टीकरण देण्यास सांगितले. मात्र अपघाताच्या तपासाचा संपूर्ण तपशील सार्वजनिक करण्याची याचिकाकर्त्यांची विनंती न्यायालयाने अमान्य केली. अपघाताचा तपास निष्पक्षपातीपणे व्हावा ही याचिकाकर्त्यांची विनंती मान्य करता येईल. तपास हा निष्पक्षपातीपणेच झाला पाहिजे. मात्र तपास पूर्ण होईपर्यंत संपूर्ण तपशील जाहीर करण्याची विनंती मान्य करता येणार नाही, असे न्यायालयाने सांगितले. तपास पूर्ण होण्याआधीच बेजबाबदारपणे वैमानिकांना दोषी धरणे चुकीचे आहे. त्यामुळे वैमानिकाच्या कुटुंबियांना नाहक मनस्ताप सहन करावा लागेल, असे न्या. सूर्य कांत म्हणाले.





## संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# मराठवाड्यात महाप्रलय, शेतकर्‍यांना कर्जमाफी केव्हा?



मराठवाडा म्हटले की, दुष्काळ, पाण्याचे दुर्भिक्ष, ओसाड माळरान असेच चित्र डोळ्यासमोर येते. यंदाच्या पावसाळ्याने हे चित्र पूर्णपणे पालटून टाकले. साधारण जूनमध्ये पावसाला सुरुवात होते. यंदा मे महिन्यापासूनच मान्सूनपूर्व पावसाने मराठवाड्यात हजेरी लावली. गेल्या काही दिवसांपासून मराठवाड्यात महाप्रलय आला आहे. पावसाने छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, बीड, लातूर, हिंगोलीसह मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांना अक्षरशः झोडपून काढले. गोदावरी नदी दुथडी भरून वाहात आहे. आभाळ फाटल्यासारखा पाऊस बरसत आहे. सोलापूर जिल्ह्यालाही पावसाचा मोठा फटका बसला आहे. पुराने 8 जणांचा जीव घेतला. 150 हून अधिक गुराढोरांचा पावसाने बळी घेतला. 70 लाख एकरावर नुकसान झाले. पिकं, फळबागांचे नुकसान आणि पाण्याखाली गेलेला संसार याने मराठवाडा मोडकळीस येऊन पडला आहे. मराठवाड्यात ओला दुष्काळ जाहीर करण्याची, त्यासोबतच मदतीचे पॅकेज जाहीर करण्याची नितांत गरज आहे. महायुती सरकार मात्र काडीने औषध लावण्याचा केविलवाणा प्रयत्न करत आहे. मराठवाड्यात 975.5 मि.मी. पाऊस झाला. सरासरीच्या 102 टक्के पाऊस झाला आहे. शेकडो गावे पाण्याखाली गेली. पुरात लोक अडकलेले आहेत. धाराशिव, बीडमध्ये एनडीआरएफकडून हेलिकॉप्टरने बचाव कार्य सुरू आहे. आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन पूरग्रस्त जिल्ह्यात ठाण मांडून आहेत. त्यांनी अधिक हेलिकॉप्टरची मागणी मुख्यमंत्र्यांकडे केली. पुरात अडकलेल्यांची सुटका एनडीआरएफ, एसडीआरफ करत आहे. सरकारने 31 लाख 64 हजार शेतर्क्यांना 2215 कोटींची मदत जाहीर केली. त्यातील 1829 कोटी रुपये जिल्ह्यांमध्ये जमा झाले आहेत. पुढील आठ ते दहा दिवसांमध्ये उर्वरित मदतीची रक्कम जमा होईल. सरकारने मदतीचे सर्वाधिकार स्थानिक प्रशासनाला म्हणजेच जिल्हाधिकार्यांना दिले आहेत, हा एक चांगला निर्णय घेण्यात आला. शेकडो एकर शेतजमीन खरवडून गेली. या शेतर्क्यांना तत्काळ मदतीची गरज आहे. अजूनही पाऊस आणि पूरस्थिती कायम आहे. पुरातून वाचलेल्या नागरिकांना शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, जेवण, निवारा यांची आता आवश्यकता आहे. नुकताच गणपती उत्सव होऊन गेला. नवरात्रीला सुरुवात झाली. यंदा उत्सव मंडळांनी स्वयंस्फूर्तीने पुढे आले पाहिजे.

मराठवाड्याला सापत्न वागणूक दिली जात असल्याचा विरोधकांचा आरोप आहे. हा काळ राजकारण करण्याचा नाही, मात्र त्यांच्या बोलण्याकडेही सत्ताधार्यांनी दुर्लक्ष करता कामा नये. महायुतीने सरसकट कर्जमाफीचे आश्वासन दिले होते, याचा विसर अर्थमंत्री अजित पवारांना पडला असला तरी मुख्यमंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना अजून पडलेला दिसला नाही. त्यामुळे ज्याप्रमाणे फक्त मराठवाड्यासाठी हैदरबाद गॅझेटच्या माध्यमातून आरक्षण जाहीर करणारा जीआर काढला आहे, तसाच मराठवाड्यातील शेतर्क्यांसाठी सरसकट कर्जमाफी केली जावी, ही मागणी तेथील परिस्थिती पाहता काही अवास्तव नाही. पीक, गुरं-ढोरं, जमीन आणि पाणंद रस्ते यांचे मोठे नुकसान झाले आहे. मदत देताना फक्त पिकापुरती नाही तर जमीन, दुधाळ जनावरे, रस्ते यांचाही विचार करावा लागणार आहे. पंचनामे प्रत्यक्ष पाहणी करून आणि शेतर्क्यांना विश्वासात घेऊन करणे गरजेचे आहे. असाच पावसाचा कहर नुकताच पंजाबात दिसून आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पूरग्रस्त भागाची हवाई पाहणी करून पंजाबला 1600 कोटी रुपये मदतीची घोषणा केली. ही मदत पंजाबात झालेल्या नुकसानीच्या तुलनेत फारच त्रोटक असल्याची टीका विरोधकांनी केली. महाराष्ट्रात भाजपच्या विचारांचेच सरकार आहे. येथेही केंद्राकडून विशेष पॅकेज दिले जाण्याची अपेक्षा आहे राज्य सरकार मदतीचे आकडे सांगत आहे, मात्र ओला दुष्काळ आणि सरसकट कर्जमाफीबद्दल ब्र काढयाला तयार नाही. ज्याला मदत करायची आहे, त्याला बहाणे सांगण्याची गरज नसते. फडणवीस ऑक्टोबर 2020 मध्ये विरोधी पक्षनेते होते. बीड जिल्ह्यात अवकाळी पाऊस झाला होता. तेव्हा शेतर्क्यांना सरसकट मदत करण्यासाठी रस्त्यावर उतरून संघर्ष करण्याची भाषा त्यांची होती. विद्यमान अर्थमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही विरोधी बाकांवरून ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी केलेली. पूरग्रस्त भागात ओला दुष्काळ जाहीर करा. त्यातून शेतर्क्यांना थेट मदत जाहीर करा. या भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करा. शेतर्क्यांना एक रकमी मदत द्या. शेतर्क्यांना थेट मदत दिली पाहिजे. शेतमजुरांच्या हाताला काम नाही. शेतमजुरांचे हाल हे अतिशय वाईट असतात. त्यांचे हातावर पोट असते. त्यांच्यासाठी अन्नधान्याचा पुरवठा केला पाहिजे. त्याचीच सध्या सर्वाधिक गरज आहे. शेतर्क्यांना थेट पैशांची मदत करा. आदिवासी भागातील नागरिकांना या मदतीची मोठी गरज आहे. याची तरतूद अर्थसंकल्पात असते, हे 2022 साली तत्कालीन विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले होते. आता तेच राज्याचे अर्थमंत्री आहेत. नऊ वेळा त्यांनी अर्थसंकल्प सादर केलेला आहे. तेव्हा आता त्यांनी शेतर्क्यांना देताना आखडता हात ठेवू नये. शेतर्क्याला आपण शेतकरी राजा, बळीराजा म्हणतो. या राजावर निसर्ग कोपला आहे. तेव्हा सरकारने त्याचे पालकत्व घेऊन त्याच्या संपूर्ण पुनर्वसनाची जबाबदारी घेतली पाहिजे. पण प्रत्यक्षात मायबाप सरकार उदार झाले आणि हाती भोपळा दिला अशी तक्रार होत आहे. हे सरकारला नक्कीच शोभणारं नाही. शेतर्क्यांच्या जीवन-मरणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यांच्या आसपास फक्त पाणीच पाणी आहे आणि त्यांच्या डोळ्यातही पाणी आहे. या काळात शिवसेना ठाकरे गटाचे खासदार ओमराजे निंबाळकर हे प्रत्यक्ष पूरग्रस्त भागात जाऊन नागरिकांची मदत करत आहेत. त्यांचे कौतूक आहेच, पण हिच तत्परता सत्ताधार्यांकडून पूरग्रस्तांच्या मदत आणि पुनर्वसनासाठी आता दिसली पाहिजे. विरोधी बाकांवरून सरकारला कशी आणि कुठून मदत करता येते हे सुनावर्णायांनी आता मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री पदावर असताना आपलेच शब्द खरे करून दाखवण्याची गरज आहे. मराठवाड्यातील माणूस सोशिक आहे, आता त्यांच्या सहनशिलतेचा अंत पाहू नका.

# भारतीय विद्यार्थ्यांच्या अमेरिकन ड्रीमची नौका बुडणार की काय?




अमेरिकेने नुकत्याच घेतलेल्या एका मोठ्या निर्णयामुळे संपूर्ण जगभरातील- विशेषतः भारतीय- विद्यार्थी, क्ळ व्यावसायिक आणि उद्योगक्षेत्रात चर्चा सुरू झाली आहे. राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांच्या आदेशानुसार, H-1B व्हिसा अजार्साठी आता एक लाख डॉलर्स म्हणजेच जवळपास ८८ लाख रुपये फी आकारली जाणार आहे. ही फी केवळ नवीन अर्जदारांसाठी असून, विद्यमानधारक किंवा नूतनीकरणसाठी नाही.

H-1B हा अमेरिकेतील परदेशी कुशल कामगारांसाठी सर्वाधिक लोकप्रिय व्हिसा प्रकार आहे. भारतीय विद्यार्थी अमेरिकेत उच्चशिक्षणानंतर रोजगारासाठी हाच मार्ग निवडतात. अमेरिकन उद्योगांवर यामुळे दूरगामी परिणाम होणार आहेत. H-1Bवर भरती केलेल्या प्रत्येक उमेदवारामागे अतिरिक्त खर्च करावा लागल्यामुळे आयटी कंपन्यांच्या नफ्याला कात्री लागेल. अमेरिकेत संगणकशास्त्र, डेटा सायन्स, अक् सायबर सिक्युरिटी यांसारख्या क्षेत्रात स्थानिक कामगार अपुरे आहेत. भारतीय व इतर परदेशी तंत्रज्ञ कमी झाल्यास उद्योगांना आवश्यक कौशल्याची कमतरता भासेल. संशोधन व नवोन्मेषाची गती कमी होईल. कॅनडा, युरोप आणि भारतासारखे देश परदेशी टॅलेंट आकर्षित करतील.

आपल्या पारंपरिक 'मागा' मतदारांना आकर्षित करण्यासाठी ट्रम्प यांची ही राजकीय खेळी असली, तरी ल्1इ चा गैरवापर झालेला आहे यात शंकाच नाही! सतत विकसित होणाऱ्या अक मुळे आता प्राथमिक स्तरावरची कामे करण्यास H1B धारकांची गरज लागणार नाही, हेही खरेच! अमेरिकन काँग्रेसमध्ये रिपब्लिकन पक्षाचे मताधिक्य असल्यामुळे राष्ट्रीय सुरक्षेच्या परिप्रेक्ष्यात असणाऱ्या या कार्यकारी आदेशाला मंजुरी मिळण्याचे मिळण्याची शक्यता तिथे जास्त आहे. या प्रकरणाचा खटला अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयात गेला, तर रिपब्लिकन न्यायमूर्तींची सहा-तीन अशी मेजॉरिटी असल्याने तिथेही वेगळा निर्णय लागण्याची शक्यता नाही. भारतासाठी ही एक मोठी संधी असू शकते.

योग्य धोरणे आखली तर या संकटाचे ह्यसंधीह्ण रूपांतर करून भारताला 'ब्रेन ड्रेन'ऐवजी 'ब्रेन गेन' साधता येऊ शकते. अमेरिकेत संधी न मिळालेल्या तरुणांना भारतातच आकर्षक नोकऱ्या आणि संशोधन संधी मिळणे मात्र गरजेचे आहे. सरकार व खासगी क्षेत्राने अमेरिकेतून परतणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी व्हेंचर कॅपिटल, इन्क्युबेशन सेंटर, जागतिक बाजारपेठेत प्रवेश या सुविधा द्याव्यात. IIT, IISc, IIM यांसारख्या संस्था आंतरराष्ट्रीय पातळीवर आणण्यासाठी परदेशी प्राध्यापक, संशोधन अनुदान आणि जागतिक दजार्चे अभ्यासक्रम सुरू करणे आवश्यक आहे. कॅनडा, जपान, जर्मनी, फ्रान्स या देशांसोबत शैक्षणिक व रोजगार करार वाढवून विद्यार्थ्यांसाठी पर्याय उपलब्ध करून देता येऊ शकतील.

भारतीय विद्यार्थ्यांवर या निर्णयाचा होणारा मुख्य परिणाम म्हणजे करिअरची अनिश्चितता! भारतीय विद्यार्थी F1 व्हिसावर अमेरिकेत जातात. शिक्षण संपल्यानंतर बारा महिन्यांसाठी ऑप्शनल प्रॅक्टिकल ट्रेनिंग (OPT) वर काम करू शकतात किंवा रळएट मधले असतील तर तीन वर्षे काम करू शकतात. याच काळामध्ये H1B व्हिसासाठी अर्ज करता येतो. या व्हिसाचा निर्णय आता लॉटरीऐवजी पगार आणि मेरिटवर ठरणार आहे. आजपर्यंत भारतीय विद्यार्थी अमेरिकेत शिक्षण घेतल्यानंतर H-1B द्वारे नोकरी मिळवून तिथेच स्थायिक होत होते; पण नव्या फीमुळे कंपन्या परदेशी उमेदवारांना रोजगार देताना दोनदा विचार करतील.

भारतीय विद्यार्थ्यांसाठी F1 व्हिसाला यावर्षी खूप दिरंगाईने मंजुरी मिळत होती; तसेच व्हिसा नाकारला जाण्याचे प्रकारही वाढले होते. शिवाय आता ओपीटीदरम्यान जास्ती कर भरायला लागणार आहेत. भारतीय विद्यार्थ्यांना ओपीटी मिळण्याच्या शक्यताच कमी झाल्या आहेत, कारण H1B साठीचे वाढीव शुल्क. F1, OPT आणि H1B अशा तीन बिंदूंच्या या बमुर्डा ट्रँगलमध्ये 'अमेरिकन ड्रीम'ची नौका बुडते का काय? अशी स्थिती निर्माण झाली आहे!! मोठे शैक्षणिक कर्ज घेऊन अमेरिकेत गेलेल्यांच्या अडचणी अधिक गुंतागुंतीच्या होतील.

आता भारतीय विद्यार्थ्यांनी अमेरिकेकडे डोळे लावून बसण्याची मानसिकता बदलणे गरजेचे आहे. इतर देशांत करिअरच्या चांगल्या संधी आहेत. जपान जर्मनी इत्यादी देशांचा विचार होऊ शकतो. डेटा ॲनालिटिक्स, क्वांटम कम्प्युटिंग, ब्लॉकचेन, सायबर सिक्युरिटी, ग्रीन टेक्नॉलॉजी या क्षेत्रांत जागतिक मागणी आहे. आज भारतात अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या आपली संशोधन केंद्रे स्थापन करत आहेत. चांगल्या पगाराच्या नोकऱ्या उपलब्ध होत आहेत. इंजिनिअरिंगच्या मुलांनी GATE देऊन M.Tech. चा विचार करावा. मास्टर्स झाले की, पूर्ण शिष्यवृत्तीवर अमेरिकेतसुद्धा जाता येईल! मात्र, हवा बदलते आहे. शिक्षण कर्ज घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी इतर देशांतील खर्च, परतावा आणि नोकरीच्या संधींचा सखोल अभ्यास करून निर्णय घ्यावा.

# दिवाळीच्या फटाक्यांवर सरसकट बंदीने प्रदूषणाचा प्रश्न सुटेल काय?



राहुल सर्वोच्च न्यायालयात चालू असलेल्या एका सुनावणीमुळे दिवाळीच्या फटाक्यांमुळे होणाऱ्या हवेच्या प्रदूषणाचा विषय प्रकाशझोतात आला आहे. दिल्लीच्या आसपासच्या फटाके उद्योजकांनी त्यांचे परवाने रद्द करण्याच्या एका निर्णयाविरोधात केलेल्या याचिकेवरील सुनावणीदरम्यान न्यायालयाच्या खंडपीठाने म्हटले की, फटाक्यांच्या उत्पादनावर फक्त दिल्लीतच बंदी का, देशभर का नाही, दिल्लीतल्या नागरिकांचे आरोग्य इतर नागरिकांच्या आरोग्यापेक्षा जास्त मोलाचे आहे का? दुसऱ्या दिवशी खंडपीठाने फटाके उद्योगांचे परवाने रद्द करण्याच्या पूर्वीच्या निर्णयाला स्थगिती दिली! अर्थात सुनावणी अजून चालू आहे, त्यामुळे आताच काही निष्कर्ष काढता येणार नाही.

भारतातील शहरांमधल्या हवेच्या प्रदूषणाला सर्वात जास्त कारणीभूत असणारे घटक म्हणजे रस्त्यांवरील वाहने, चालू बांधकामे आणि कचऱ्याचे अव्यवस्थापन. वाहनांच्या इंजिनातून बाहेर पडणाऱ्या प्रदूषणात गेल्या दोनेक दशकांमध्ये बऱ्यापैकी घट झालेली आहे. तरीही, वाहनांचे योगदान जास्त आहे, ते वाहनांची रबरी चाके व रस्त्यांच्या घर्षणातून हवेत उडणाऱ्या धूळ आणि रबरच्या कणांमुळे. बांधकामे चालू असताना, हवेत सिमेंट, माती, डांबर, इ. चे सूक्ष्म कण उडतात. यात २.५ मायक्रोमीटरपेक्षा लहान व्यासाचे कण थेट फुप्फुसामध्ये जाऊन पोहोचतात आणि हे सर्वाधिक धोकादायक आहे. घन कचऱ्याचे वर्गीकरण केले जात नाही व कचरा गोळा करण्याची यंत्रणा अकार्यक्षम आणि अपुरी आहे. बराचसा मिश्र कचरा उघड्यावर अशास्त्रीय पद्धतीने जाळला जातो किंवा कुजतो. त्यातून कार्बन मोनॉक्साइड, मिथेन, सल्फर डायॉक्साइड व इतर अनेक घातक वायू हवेत मिसळतात. शहरांतील जलाशयांमध्येही सांडपाणी आणि घन कचरा कोणतीही प्रक्रिया न करता मिसळला जातो. तिथे त्याचे विघटन होऊनही मिथेन व इतर घातक वायू हवेत मिसळतात. या सर्व समस्या सर्व शहरांत वर्षभर आहेत. त्यामुळे शहरांमधील प्रदूषणाची पातळी धोकादायक असते.

उन्हाळ्यात थोडा-फार वारा असतो, त्यामुळे प्रदूषण इतस्ततः पसरते, त्याची तीव्रता कमी होते. पावसाळ्यात पावसाच्या पाण्याबरोबर काही प्रदूषण जमिनीवर येते आणि तात्कालिक परिस्थिती सुधारते. मात्र, हिवाळ्यात प्रश्न चिघळतो. उत्तर भारतात हिवाळ्यात वारा पूर्ण पडलेला असतो. त्यामुळे हवेतले प्रदूषण शहरावरच साठत राहते. त्याचवेळी ग्रामीण भागात पिकांची कापणी झाल्यावर शेतात पडलेला काडीकचरा शेतकरी जाळून टाकू लागतात. यामुळेही प्रदूषणात भर पडते. याचदरम्यान दिवाळीतल्या फटक्यांचा धूर प्रदूषणाची तीव्रता आणखी वाढवतो. फटाक्यांचा धूर हा इतर मालाच्या ओज्याने दबलेल्या उंटाची पाठ मोडणारी शेवटची काडी आहे. फटाक्यांवर बंदी घातली आणि ती पाळली गेली, तरी वर्षभरातली प्रदूषणाची मूळ समस्या सुटणार नाही. पण, दिवाळीच्या कालावधीत प्रदूषण जी अत्युच्च पातळी ओलांडते, त्याला नक्कीच आळा बसेल आणि या दिवसांत आरोग्यावर होणारे हानीकारक परिणाम टाळता येतील. फटाके ध्वनी प्रदूषणातही भर घालतात, त्यालाही आळा बसू शकेल. पण, फटाके निर्मितीचे उद्योग बंद झाले, तर कित्येक लोकांचा रोजगार जाणार आहे. नागपूरस्थित नॅशनल एनव्हायरमेंटल इंजिनिअरिंग रिसर्च इन्स्टिट्यूट (नीरी) या संस्थेने 'हरित फटाके' विकसित केले आहेत. या फटाक्यांमध्ये कमी घातक रसायने वापरली जातात. त्यातून पाण्याची वाफही बाहेर पडते व ती फटाक्यांचे कण हवेत उडण्याला प्रतिबंध करते. या फटाक्यांचा आवाजही कमी असतो. फटाके उद्योगाने या फटाक्यांची निर्मिती करावी व ग्राहकांनीही हरित फटाके विकत घ्यावे, अशी शिफारस हरित लवाद व प्रदूषण नियंत्रण महामंडळाने पूर्वीच केलेली आहे. पण, याबाबत पुरेशी जनजागृती नाही आणि राजकीय इच्छाशक्तीही कमी पडते.

सध्या चालू असलेल्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने हरित फटाक्यांबद्दलची माहिती नीरी व प्रदूषण नियंत्रण महामंडळाकडून मागवली आहे. याचिका दिल्लीतल्या फटाके उत्पादकांची असली, तरी जे काही करायचे ते भारतभरासाठी लागू करावे, असे सर्वोच्च न्यायालयाचे मत दिसते. भारताच्या राज्यघटनेने प्रदूषणमुक्त हवा, पाणी, इ. मिळणे हा मूलभूत हक्क नागरिकांना दिलेला आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने आणखी व्यापक विचार करून एकंदरच हवा आणि इतरही प्रदूषणाच्या मुद्द्याला हात घालावा. गणेशोत्सवात ठिकठिकाणी ध्वनी प्रदूषण, पाणी प्रदूषण, इ. टाळण्यासाठी आदेश दिले गेलेले असूनही प्रत्यक्ष विसर्जन मिरवणुकीत ते कसे धाब्यावर बसवले गेले, हे आपण अनुभवलेले आहे. त्यामुळे न्यायालयाचा काहीही आदेश आला, तरी तो पाळला जाणार की नाही, हाही कळीचा मुद्दा आहे!

# ऑनलाइन गेमिंग! संधी की संकट?



कौशल्यावर आधारित ऑनलाइन खेळांविषयी विचार करता, हे गेम्स पूर्णपणे स्पर्धात्मक कौशल्य, अभ्यास, एकाग्रता आणि धोरणात्मक विचार यावर आधारलेले असतात. यात बुद्धीला चालना देणारे व्हिडिओ गेम्स, पझल्स, क्विझ, शैक्षणिक ॲप्स तसेच टीमवर्क वाढवणारे मल्टीप्लेयर गेम्स यांचा समावेश होतो. हे गेम्स विद्यार्थ्यांचे विषयातील ज्ञान वाढवतात, त्यांच्यातील तार्कीक विचारशक्ती आणि वेगवेगळ्या विषयांच्या कौशल्याचा विकास करतात.

उदाहरणार्थ, भाषिक कौशल्यासाठी शब्दकोडी, गणिती विचारसरणीसाठी गणिती पझल्स, किंवा विज्ञान, इतिहास, भूगोल विषयांचा प्रत्यय आणून देणारे शैक्षणिक सिम्युलेशन गेम्स हे विद्यार्थ्यांसाठी मोठ्या प्रमाणावर फायदेशीर ठरतात. ते मुख्यतः मनोरंजन व शिक्षण याची सांगड घालतात. अशा गेम्समध्ये आर्थिक व्यवहार किंवा लकी ड्रॉ सारखी संधी किंवा आकर्षण नसते, त्यामुळे अपायकारक व्यसनोत्सुकता अथवा सामाजिक, आर्थिक धोके उद्भवत नाहीत.

निखळ करमणुकीसाठी विकसित ॲनिमेटेड फिल्म्स यांचे स्वरूप बऱ्याच प्रसंगी मूल्यशिक्षण, सर्जनाशी व्यक्तिमत्व विकास, कल्पनाशक्तीला वाव देणे आणि आरामदायक विरंगुळा हेच असते. ॲनिमेटेड फिल्म्स या मुलांसाठी तसेच प्रौढांसाठीही तितकेच आकर्षक माध्यम असतात. या माध्यमातून सृजनशील कथानक, गोड संगीत, रंगीत पात्रे आणि तंत्रज्ञानाचा मनोवेधक उपयोग पाहायला मिळतो. या फिल्म्स ज्ञानवर्धनासोबत मनोरंजन, दैनंदिन जगण्याचा गोडवा, संस्कार, जीवनमूल्यांचे संदेश, सामाजिक प्रश्न यासारख्या मुद्द्यांवर सकारात्मक प्रभाव पाडतात. उदा हनुमान, महावतार नरसिंह आदी.

तिसरा प्रकार म्हणजे पैसे लावावे लागणारे जुगार किंवा बेटिंगचे खेळ. यांचे वैशिष्ट्य म्हणजे यातून निर्माण होणारा फक्त निव्वळ आर्थिक लाभ अथवा तोटा या भावनेला केंद्रस्थानी आहे. कौशल्य, शिक्षण किंवा आरोग्य या काहीच गोष्टींशी याचा थेट संबंध नसतो. पैसे किंवा मालमत्तेवर सट्टा लावून येणाऱ्या अपयश-यशाचा प्रवास हा अनेकदा नशेशिवाय, अनियंत्रित, विकृत आणि व्यसनात्मक असतो. यात लकी ड्रॉ, काड्र्स, नंबर गेम्स, कॅसिनो गेम्स, ऑनलाइन बेटिंग प्लॅटफॉर्म्स, क्रिकेट किंवा फुटबॉलसारख्या खेळांवर फेस-टू-फेस किंवा ऑनलाइन सट्टेबाजी, अशी रूपे आहेत.

कोणते तीन पैलू स्पष्ट दिसतात?

तंत्रज्ञानाच्या युगात ऑनलाइन गेमिंगचे तीन पैलू स्पष्ट दिसतात - शिक्षण व कौशल्यवर्धन, संस्कार आणि मनोरंजन देणारे ॲनिमेशन आणि व्यसनमूलक जुगार. पहिले दोन अंग समाजासाठी उपयुक्त तर तिसरे अंग विनाशकारी. त्यामुळे तरुण पिढीला योग्य वेळी मार्गदर्शन देणे ही पालक, शिक्षक आणि समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.

AVGC-फ धोरणात काय?

ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स, गेमिंग, कॉमिक्स व एक्सटेंडेड रिएलिटीला प्रोत्साहन

कला, कौशल्य व तंत्रज्ञान यांचा संगम

रोजगार निर्मिती आणि तरुणांना संधी

सुरक्षित गेम्सचे फायदे

पझल्स व क्विझमुळे ज्ञानवृद्धी

भाषिक व गणिती कौशल्य वृद्धिंगत

टीमवर्क आणि तार्किक

विचारशक्ती वाढ

जुगाराचे धोके

आर्थिक नुकसान आणि कर्जबाजारीपणा

मानसिक ताण व नातेसंबंधातील तणाव

गुन्हेगारी व व्यसनाचा धोका

पालक व शिक्षकांची भूमिका

आज मोबाइल हा मुलांच्या हातात सहज पोहोचतो. अशावेळी पालक आणि शिक्षकांनी मार्गदर्शन करणे अपरिहार्य आहे. कायदेशीर आणि बेकायदेशीर खेळांमधील फरक मुलांना समजावून सांगणे गरजेचे आहे. सुरक्षित, शिक्षणपूरक गेम्स निवडून देणे, तसेच मैदानावरील खेळ, वाचन, कला व छंद याकडे वळवणे आवश्यक आहे. पालक स्वतः मोबाइल व्यसनात अडकले तर मुलांकडून आदर्श वर्तनाची अपेक्षा करणे व्यर्थ आहे. शाळा-महाविद्यालयांत नागरिकशास्त्र विषयात ऑनलाइन व्यसनाचे दुष्परिणाम शिकवले गेले पाहिजेत.

श्रीमंत होण्याचा हव्यास...

हे खेळ सुरुवातीला चित्तथरारक, मोहक आणि 'लवकर श्रीमंत होण्याचा' हव्यास निर्माण करणारे असले तरी पुढे जाऊन आर्थिक नुकसान, मानसिक आरोग्याच्या समस्या, सामाजिक आणि कौटुंबिक नात्यांमध्ये तणाव आणि अनेकदा गुन्हेगारी जन्मास घालतात. यामुळेच यावर कायद्याने बंदी आहे.

# माँ कुष्मांडा

शारदीय नवरात्रीचा चौथा दिवस हा देवी कुष्मांडा यांना समर्पित आहे, ज्यामध्ये भक्त दुर्गेच्या या रूपाची पूजा करतात आणि तिचा आशीर्वाद घेतात. या खास दिवशी घालायचे शुभ वेळ, विधी, पूजा प्रक्रिया आणि रंग पहा.

माँ कुष्मांडा कोण आहे?

नवरात्रीचा चौथा दिवस देवी कुष्मांडा यांना समर्पित आहे, तिचे नाव 'कु' (लहान), 'उष्मा' (ऊजार्वान) आणि 'अंड' (अंडी) असे आहे. ती सिंहिणीवर स्वार आहे आणि तिचे आठ हात आहेत, तिच्या उजव्या हातात कमळ, कमंडल, धनुष्य आणि बाण आहे आणि तिच्या डाव्या हातात अमृत कलश, जपमाळ, गदा आणि चक्र आहे. अष्टभुजा देवी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या माँ कुष्मांडा अनाहत किंवा हृदय चक्राचे नियंत्रण करतात. या शुभ दिवशी, चिंता, नैराश्य, भीती किंवा भूतकाळातील पश्चात्ताप अनुभवणाऱ्या भक्तांना तिची प्रार्थना करण्यास आणि पूजा करण्यास प्रोत्साहित केले जाते.

पूजाविधी, समाग्री आणि भोग

शारदीय नवरात्रीच्या चौथ्या दिवशी, ब्रह्म मुहूर्तावर लवकर उठा, स्नान करा आणि कुष्मांडा मातेची पूजा करण्यापूर्वी पिवळे कपडे घाला. सिंदूर, पवित्र धागा, चंदनाचा लेप आणि तांदूळ असलेली पूजा समाग्री तयार करा. देशी तुपाचा दिवा लावा आणि सिंदूर आणि माला देवीला अर्पण करा.

मीठा पान, सुपारी, लौंग आणि इलायची यासह पाच प्रकारचे हंगामी फळे अर्पण करा आणि आर्थिक स्थिरता आणि समृद्धीसाठी आशीर्वाद मिळविण्यासाठी मालपुआचा भोग घ्या. दुर्गा चालीसा, दुर्गा सप्तशती पाठ आणि देवीला समर्पित इतर मंत्रांचे पठण करा. आरतीने समारोप करा आणि भोग प्रसाद द्या. संध्याकाळी उपवास सोडण्यापूर्वी, पुन्हा आरती करा आणि सात्विक जेवणाने उपवास सोडा.



प्रार्थना, पूजा मंत्र आणि स्तुती

प्रार्थना-
सुरसंपूर्णा
कलशम
रुधिरपुतमेव चा।
दधना
हस्तपद्माभ्यं कुष्मांडा
शुभदस्तु मी ॥

पूजा मंत्र- ओम
देवी कुष्मांडाय नमः ॥

स्तुति- या देवी
सर्वभूतेषु मां कुष्मांडा
रुपेणा संस्थिता ।
नमस्तस्यै नमस्तस्यै
नमस्तस्यै नमो नमः ॥



# केडगावची रेणुकामाता - अहिल्यानगर

महाराष्ट्रातील शक्तिपीठांपैकी एक मुख्य स्थान म्हणजे माहूरगडची रेणुकामाता. जिचे प्रतिरूप म्हणून केडगावची रेणुकामाता प्रसिद्ध आहे. या मंदिरातील देवीची मूर्ती अगदी हुबेहूब माहूरगडावर वसलेल्या रेणुका मातेच्या मूतीर्सारखी आहे. या मंदिरात नवरात्रोत्सवात भरणारी यात्रा भव्य स्वरूपाची असते. यावेळी असंख्य भाविक देवीच्या दर्शनासाठी येत असतात.

मंदिराची आख्यायिका

या मंदिराची एक आख्यायिका सांगितली जाते. त्यानुसार, फार पूवीर्ची एक गोष्ट आहे. रेणुका मातेच्या आशीवार्दाने एका गुरव कुटुंबाला पुत्ररत्न प्राप्त झाले. या मुलाचे नाव देवीच्या नावावरून 'भवानी' असे ठेवण्यात आले. लहानपणीच भवानीला रेणुका मातेच्या भक्तीची गोडी लागली. देवीच्या पूजेत तो इतका तल्लीन व्हायचा की, सर्व काही विसरून जायचा. इतकेच काय तर अनेकदा तो केडगावहून देवीच्या दर्शनासाठी माहूरगडावर जायचा. त्याच्या भक्तीवर प्रसन्न होऊन रेणुका मातेने त्याला दृष्टांत दिला. यामध्ये देवीने भवानीला म्हटले, ह्यमी तुज्या भक्तीने प्रसन्न आहे. मी तुज्यासोबत केडगावला येईन आणि तिथे वास्तव्य करेन. मात्र, प्रवासादरम्यान तू मागे वळून पाहायचे नाहीसह्ण.

ठरल्याप्रमाणे रेणुका माता भवानीसोबत केडगावच्या दिशेने मार्गस्थ झाली. बरेच अंतर कापल्यानंतर गावाच्या अगदी जवळ असताना भवानीच्या मनात शंका आली आणि त्याने मागे वळून देवीकडे पाहिले. त्याचक्षणी देवी अंतर्धान पावली आणि आहे त्याठिकाणी तिची स्वयंभू मूर्ती तयार झाली. जी अगदी हुबेहूब माहूरच्या रेणुका देवीसारखी आहे.

मंदिराचे बांधकाम

पुणे-अहमदनगर मार्गावर अहमदनगर शहरापासून जवळच केडगावमध्ये हे मंदिर आहे. या वास्तूला भक्कम तटबंदी आहे. तर मुख्य प्रवेशद्वारासमोर बाहेरच्या बाजूला दीपमाळ आणि वरच्या बाजूला नगारखाना आहे. तटबंदीच्या आतील बाजूस ओवऱ्या म्हणजेच लहान लहान खोल्या आहे. जिथे विविध धार्मिक विधी होतात. मंदिराच्या आवारात इतर देवीदेवतांची मंदिरे देखील आहेत. मंदिराच्या रचनेत सभामंडप आणि गर्भगृह आहे. गर्भगृहात रेणुका मातेची मूर्ती आहे. तर शेजारी तुळजाभवानीची मूर्ती आणि रेणुका मातेच्या मूर्तीसमोर ह्यभवानी गुरवह्ण या भक्ताच्या पादुका आहेत. मंदिराच्या उजवीकडे महादेवाचे मंदिर आहे.


बारमाही बारव

स्थानिक सांगतात की, दैवदैठण येथील निंबराज महाराज काशीहून परतीच्या प्रवासादरम्यान इथे थांबले होते. पोटात भुकेने खड्डा पडला होता आणि त्यावेळी देवीने गवळणीच्या रूपात येऊन त्यांना प्रसाद दिला होता. निंबराज महाराजांनी आपल्या दिव्या शक्तीने जाणले की, समोर दिसणारी गवळण स्वतः रेणुका माता आहे. त्यामुळे त्यांनी आपल्या कावडीतील गंगातीर्थ मंदिरासमोर असलेल्या बारवमध्ये ओतले. यामुळे आज मंदिराच्या बारवेचे पाणी गंगातीर्थ म्हणून प्रसिद्ध आहे. शिवाय या बारवमधील पाणी कधीच कमी होत नाही, असे भाविकांचे म्हणणे आहे.

# देवीचे असे मंदिर जिथे रात्रंदिवस धगधगतात नऊ ज्वाला

हिमाचल प्रदेशात देवीचे असे एक मंदिर आहे जिथे नऊ ज्वाला धगधगत असतात. देवीच्या 51 शक्तीपीठांपैकी हे मंदिर एक आहे. या शक्तीपीठात वर्षानुवर्षे 9 नैसर्गिक ज्वाला धगधगत आहेत. विशेष म्हणजे या ज्वालांचे रहस्य जाणून घेण्यासाठी शास्त्रज्ञ अनेक वर्षांपासून संशोधन करत असल्याचे सांगण्यात येते. मात्र अजूनही यामागचे गूढ कायम आहे.

हिमाचल प्रदेशातील कांगडा जिल्ह्यातील कालीधर टेकडीवर हे मंदिर वसलेले आहे. या मंदिराला ज्वालामुखी मंदिर असेही म्हंटले जाते. इथे ज्या नऊ ज्वाला आहेत त्या महाकाली, अन्नपूर्णा, चंडी, हिंगलाज, विंध्यवासिनी, महालक्ष्मी, सरस्वती, अंबिका आणि अंजी देवी या देवीच्या नऊ रूपांचे प्रतीक मानल्या जातात. तसेच स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, ही ज्वाला केवळ कलियुगातच विझेल.





अकबराने ज्योत विझवण्याचा केलेला प्रयत्न

ज्वालामुखी मातेच्या या मंदिराबाबत एकदा सम्राट अकबराला समजले तेव्हा तो आपल्या सैन्यासह ही ज्वाला विझवण्यासाठी पोहोचला. त्याच्या सैन्याने ते विझवण्याचे सर्व प्रयत्न केले पण यश आले नाही. हा चमत्कार पाहून अकबर देखील देवीपुढे नतमस्तक झाला असे म्हंटले जाते. त्यावेळी त्याने सोन्याचे छत्र देवीला भेट दिले याचा त्याला अभिमान झाला. त्यामुळे देवीने ते नाकारले आणि त्या सोन्याच्या छत्राचे धातूमध्ये रूपांतर झाले. हा धातू चांदी, सोने, लोखंड, पितळे नसून वेगळाच आहे. या धातूबाबत देखील संशोधन सुरू आहे.

चमत्कारिक कुंड

या मंदिराजवळ गोरखनाथ मंदिर देखील आहे. इथे एक चमत्कारिक कुंड म्हणजे तलाव आहे, ज्याला गोरख डिब्बी म्हणतात. या तलावाकडे दुरून बघितले तर त्यातील पाणी अत्यंत गरम असल्याचा भास होतो पण तलावाजवळ गेल्यावर पाणी थंड असते.


मंदिराची आख्यायिका

पौराणिक कथेनुसार, या ठिकाणी सती मातेची जीभ पडली होती. त्यामुळे येथे सती माता ज्वालांच्या रूपात विराजमान असल्याचे मानले जाते. असे म्हणतात की मंदिरात त्या ज्वालांचा आशीर्वाद भाविक घेतात आणि त्यांचा हात देखील भाजत नाही. मंदिरात देवीची मूर्ती नाही, या नऊ ज्वालांचीच देवीचे प्रतीक म्हणून पूजा केली जाते.

# सप्तश्रृंगी देवीने या पर्वतावर केला महिषासुराचा वध

महिषासुर राक्षसाचा आदिशक्तीने वध करून वाईटावर चांगल्याच विजय होतो हे दाखवून दिले होते. तेव्हापासून देवीच्या नवदुर्गा रूपांना समर्पित असणारा नवरात्रोत्सव साजरा करण्यात येतो. देवीने ज्या ठिकाणी महिषासुर राक्षसाला संपवले होते त्याचा सर्वनाश केला होता तो गड होता सप्तशृंग गड. याच गडावर सप्तशृंगी देवीचे मंदिर उभारण्यात आले होते. पौराणिक कथेनुसार देवी सप्तशृंगीने महिषासुराला याठिकाणी मारून त्याचे शीर छाटले होते. तेच शीर आजही या गडावर ठेवण्यात आलेले आहे असे बोलले जाते. गडावर जाताना महिषासुराचे एक मंदिर लागते त्याच मंदिरात या राक्षसाच्या डोक्याचे दर्शन घेता येते.





साडेतीन शक्तिपीठांपैकी एक सप्तशृंगी मंदिर

देशभरात देवीची १०८ शक्तीपीठे असल्याचे आपल्याला माहित आहे. देवी सतीच्या देहाला हातात घेऊन आक्रोश करताना महादेव जेव्हा सर्वत्र फिरत होते त्यावेळी देवीच्या शरीराचे भाग ज्या ज्या ठिकाणी पडले तिथे शक्तीपीठ तयार झाले. या प्रत्येक स्थानाचे महत्त्व आणि महात्म्य विशेष असल्याने त्याची मान्यता आहे. भागवत पुराणानुसार देवीच्या एकूण शक्तिपीठांपैकी साडेतीन शक्तिपीठे ही महाराष्ट्रात आहे. असे म्हणतात की ही शक्तीपीठे ॐ काराचे रूप आहेत. ॐ कारामध्ये साडेतीन मात्रा आहेत. 'अ'कार पीठ माहूर 'उ'कार पीठ तुळजापूर 'म'कार पीठ कोल्हापूर आणि ऊर्धमात्रा सप्तशृंगी. साडेतीन शक्तीपीठांपैकी याच सप्तशृंगी पर्वतरांगांवर देवीने महिषासुराचा वध केल्याचे सांगितले जाते. हे देवीचे मूळ पीठ मानले जाते. तसेच शुंभनिशुंभ व महिषासुर या राक्षसांचा वध केल्यावर देवीने या गडावर वास्तव्य केले असे पौराणिक कथांमध्ये सांगण्यात आलेले आहे.

सप्तशृंगी देवीची महती

ब्रह्मदेवाच्या कमंडलूमधून ज्या गिरिजा महानदीचे स्वरूप निघाले ती म्हणजे सप्तशृंगीदेवी असे सांगण्यात येते. देवीचे अठराभुजा सप्तशृंग रूप येथे पाहावयास मिळते. ही देवीची मूर्ती स्वयंभू तसेच भव्य आहे. मंदिराच्या गाभाऱ्याला शक्तिद्वार, सूर्यद्वार आणि चंद्रद्वार असे तीन दरवाजे आहेत. या तिन्ही दरवाजातून देवीचे दर्शन घडते. देवीची मूर्ती ८ फूट उंचीची आहे. ही मूर्ती शेंदुरी रंगाची आहे. देवी सप्तशृंगीने प्रत्येक हातामध्ये वेगवेगळी शस्त्रे धारण केली आहेत. सप्तशृंगी देवीचे योद्धा रूपच जणू या गडावर आपल्याला पहायला मिळते. महिषासुराच्या संहारासाठी सज्ज झालेली देवी मूर्ती रूपात गडावर पहायला मिळते. पौराणिक कथेनुसार महिषासुराचा वध करण्यासाठी ब्रह्मा, विष्णू, महेश, इंद्र आदींनी आपापली शस्त्रे व अस्त्रे देवीला दिल्याचे सांगितले जाते.

सप्तश्रृंगी गडाचे महत्व

सप्तश्रृंगी देवीच्या गडाला ओळखले जाते सप्तश्रृंगी देवीचे निवासस्थान म्हणून.. मात्र या गडाची कथा ही सतयुगापासून आहे. रावणाने जेव्हा देवी सतीला कैद करून ठेवले होते त्यावेळी राम लक्ष्मण यांनी रावणाशी युद्ध केले. त्यादरम्यान लक्ष्मणाला बाण लागून त्यांचे प्राण कंठाशी आले होते. लक्ष्मणाला वाचवण्यासाठी हनुमानजींनी द्रोणागिरी पर्वत उचलून नेला. ज्यावेळी हनुमानजी द्रोणागिरी पर्वत घेऊन चालले होते त्यावेळी पर्वताचा काही भाग खाली पडला. तो भाग ज्याठिकाणी पडला तिथे जो गड तयार झाला तोच पर्वत डोंगर किंवा गड म्हणजे आजचा सप्तश्रृंगी देवीचा गड आहे. याच गडावर देवीने राक्षसाचा संहार केल्याची कथा आहे.

सप्तश्रृंगी देवीच्या मूर्तीचे रहस्य

सप्तश्रृंगी देवीच्या मूर्तीचे एक खास वैशिष्ट्य म्हणजे या देवीच्या चेहऱ्यावरील भाव हे सतत बदलताना दिसतात. देवीची ही मूर्ती अत्यंत जीवित भासते. भक्ताच्या मनातील भावाप्रमाणे देवीचे भाव त्यांना निश्चित दिसतात. असे मानले जाते की चैत्र नवरात्रात देवीचे मुख प्रसन्न भासते तर शारदीय नवरात्रात देवीचे मुख थोडे क्रोधीत असते अशी मान्यता आहे.

सप्तशृंगी गडावर कसे जायचे

सप्तश्रृंगी देवीचे स्थान नाशिक जिल्ह्यातील वणी येथे आहे. सह्याद्रीच्या पूर्व-पश्चिम डोंगररांगेत असलेले हे ठिकाण समुद्रसपाटीपासून सुमारे ४,५६९ फूट उंचीवर आहे. देवीच्या पर्वताला प्रदक्षिणा घालता येते. मात्र हा मार्ग खडतर असल्याने सर्व भक्त प्रदक्षिणा पूर्ण करू शकत नाही. सप्तशृंगी गडावर जाण्यासाठी एकूण ४७२ पायऱ्या आहेत. पर्वत चढून तुम्हाला देवीच्या दर्शनासाठी जावे लागते. मात्र गडावर जाण्यासाठी अजून एक रस्ता आहे तिथून वाहने देखील वर जातात त्यामुळे थेट गडावर देखील जाता येते. मात्र भक्तिभावाने देवीचे दर्शन घ्यायचे असेल तर शरीराला थोडे कष्ट देऊन गड चढून जायला भाविक प्राधान्य देतात. नवरात्रीत देवीच्या दर्शनासाठी प्रचंड गर्दी असते. याकाळात देवी भक्तांच्या मनोकामना पूर्ण करते अशी मान्यता आहे.

# 'नवरात्री' नावातील गूढ रहस्य! नवरात्री असे का म्हणतात?

नवरात्री...आदीशक्तीची ९ दिवस उपासनाङ्कमातेच्या चरणी लीन होत,तिचे गुणगान गाण्यात एकरुप होण्याचा आणि पुनरुज्जीवनाचा काळ! रात्री आपण विश्रांती घेतो आणि सकाळी फ्रेश मूडमध्ये आपल्या कामाला सुरुवात करतो. नवरात्रसुद्धा अशीच आहे सखोल विश्रांती देणारी..तुम्हाला त्रासांपासून मुक्त करणारी म्हणून तर नवरात्रीला प्रार्थनेचा आणि पुनरुज्जीवनाची वेळ असे म्हणतात. हे संपूर्ण विश्व आदिशक्तीच्या ऊजेर्पासून बनलेले आहे. या कालावधीत केलेली पूजा, उपासना, साधना साधकाला थेट दिव्य ऊजेर्शी जोडते. याबद्दल सविस्तर जाणून घेऊया

नवरात्रीत शक्तीचा संचार

आध्यात्मिक मान्यता आणि शास्त्रानुसार नवरात्रीत खऱ्या शक्तीचा संचार हा रात्रीच्या वेळीच होतो. हीच ती वेळ असते जेव्हा ब्रम्हांडीय ऊर्जा सर्वात बलशाली असते आणि यावेळी दिव्य स्त्री ऊजेर्चा प्रवाह वाढलेला पाहायला मिळतो. त्यामुळेच दिवसा केलेल्या साधनेऐवजी रात्रीच्या शांत वेळी केलेल्या साधनेला खूप महत्व असतं. नवरात्रीत रात्रीच्या वेळी केलेली साधना, साधकाला थेट दिव्य ऊजेर्शी जोडते ज्याने त्याची आध्यात्मिक प्रगती आणि सर्व मनोकामनांची पूर्ती वेगाने होईल.

'रात्र' या शब्दाचं आध्यात्मिक महत्व

रात्र या शब्दाचा अर्थ, रात्र जी आपल्याला आराम देते, दिवसभराच्या दगदगीनंतर जी आपल्याला शांतता प्रदान करते. आध्यात्मिक दृष्टीने रात्रीचा अर्थ म्हणजे आपल्या मनातील कोलाहल शांत करून अंतर्मुख होणे. दिवसा आपली सर्व ऊर्जा ही बाहेरच्या दुनियेत व्यस्त असते. याउलट रात्रीच्या शांततेत आपल्याला ध्यान, मंत्र, जप आणि आत्मचिंतन करण्याची संधी मिळते. यामुळेच रात्री केलेल्या साधनेस सर्वश्रेष्ठ मानले जाते.

ब्रम्हांडातील ऊजेर्शी घनिष्ट संबंध

नवरात्रीतल्या रात्री या आध्यात्मिक ऊजेर्ने परिपूर्ण असतात. यावेळी दिव्य स्त्री ऊजेर्शी घनिष्ट संबंध जुळण्याची शक्यता असते. धार्मिक आणि पौराणिक मान्यतांनुसार नवरात्रीच्या नऊ रात्रींमध्ये ब्रम्हांडात विशेष ऊर्जेच्या लहरी सक्रिय होतात. रात्रीच्या वेळी सूर्याच्या तीव्र ऊर्जेच्या अभावामुळे वातावरणात सात्विक ऊजेर्चा प्रभाव वाढतो. ती शांतता आणि ते अद्भुत वातावरण साधकाला दिव्य उर्जा आत्मसाद करण्यासाठी मदत करते.

तंत्र आणि गुप्त साधनांची वेळ

नवरात्रीच्या दिवसाता खास करून रात्रीच्या वेळी तंत्र साधनेला विशेष महत्व असतं. ही वेळ तंत्र साधना, मंत्र सिद्धी आणि इतर गुप्त साधनांसाठी सर्वात शक्तिशाली मानली जाते. साधक आणि तांत्रिक पूर्ण वर्षभर या नऊ रात्रींची आतुरतेने वाट पाहात असतात कारण यावेळी केलेल्या साधनांचं फळ हे कित्येक पटीनं जास्त आणि शीघ्रतेने मिळते. रात्रीच्या वेळेची शांतता आणि गोपनीयता अशा गूढ साधनांसाठी आदर्श वातावरणाची निर्मिती करते.

आंतरिक शांततेचा मार्ग

नवरात्रात खास विशेष करून रात्री केलेली साधना ही आंतरिक शांततेला महत्व देते. ही वेळ आपल्याला सांगते की खरी भक्ती आणि शक्ती ही बाहेरच्या दुनियेतील कोलाहलात नसून आपल्या अंतर्मनातील शांततेत आहे. या नऊ रात्रीतील दिव्य ऊजेर्चा लाभ घेऊन कुठलाही साधक स्वतःच्या आध्यात्मिक वाटचालीत शीघ्रतेनं प्रगती करू शकतो आणि देवीची असीम कृपा प्राप्त करू शकतो.

# नवरात्र आणि 9 अंक याचा काय संबंध आहे?




नवरात्र सुरु झालेली आहे. घराघरात आदीशक्तीचे पूजन आणि मातेचा जागर होत असेल. नवरात्र हा हिंदू धमार्तील विशेष महत्वाचा सण आहे ज्यात दुगार्मातेच्या नऊ स्वरूपांचे पूजन केले जाते. तर गुप्त नवरात्रीमध्ये दहा महाविद्यांचे पूजनसुद्धा केले जाते. नवरात्र आणि नऊ अंकाचा एक घनिष्ठ संबंध आहे जो धार्मिक, ज्योतिषीय आणि आध्यात्मिक रूपाने महत्वपूर्ण आहे. नवरात्रीचा नऊ अंकाशीच का संबंध असतो याविषयी जाणून घेऊया....

नवरात्र आणि 9 अंकाचा संबंध

नवरात्रीच्या नऊ दिवसात दुर्गा मातेच्या नऊ वेगवेगळ्या स्वरूपांचे पूजन केले जाते ज्यांना नवदुर्गा म्हणतात. या नऊ देवींच्या साधनेने व्यक्तीला भौतिक आणि आध्यात्मिक लाभ मिळतात. याशिवाय हिंदू ज्योतिषशास्त्रात नवग्रहांचे खूप महत्त्व आहे. ज्याचा प्रभाव मनुष्याचा जीवनावर पडतो. दुर्गा मातेच्या पूजनाने नवग्रह दोषांचे निवारण होते. नवरात्रीत पूजा केल्याने नवग्रहांची अनुकूलता प्राप्त होते.

शक्ती, जागरण, समर्पणाचे प्रतीक

जर नवरात्रीच्या महत्वाबद्दल सांगायचं झालं तर या सणाला शक्ती, ऊर्जा, समर्पण आणि आध्यात्मिक जागरणाचे प्रतीक मानले गेले आहे. नऊ ही संख्या पण शक्ती, पूर्णता आणि ब्रम्हांडीय ऊजेर्चं प्रतीक आहे असे मानतात. योग आणि तंत्र साधनेत, मानव शरीरात ९ प्रमुख चक्र आहे असेही बोलतात. नवरात्रीदरम्यान साधक आपल्या कुंडलिनी शक्तीला जागृत करण्याचा प्रयत्न करतात. ही साधना मानसिक, शारीरिक आणि आध्यात्मिक प्रगतीमध्ये मदत करते. याशिवाय आपल्या शरीरात ९ द्वार असतात म्हणजे दोन डोळे, दोन कान, दोन नाकपुड्या, एक मुख, एक मूत्र द्वार आणि एक मल द्वार. या नऊ द्वारांना पवित्र करण्यासाठी आणि सिद्ध करण्यासाठी नवरात्रीच्या सणाला विशेष महत्व असते.

पौराणिक कथांमध्ये 9 अंकाचे महत्व

पौराणिक कथेनुसार भगवान रामाने नऊ दिवस शक्तीची उपासना केली होती आणि दहाव्या दिवशी (दसरा) रावणाचा वध केला. दुर्गा सप्तशतीमध्ये ७०० श्लोक आहेत ज्यांचे विभाजन ९ भागांमध्ये केले आहे. भारतात दुर्गा मातेची ९ शक्तीपीठ आहेत, जिथे मातेच्या ९ वेगवेगळ्या स्वरूपांचे पूजन केले जाते.

नवरात्रीच्या व्रताचे 9 नियम

1. सात्विक भोजन करणे
2. ब्रह्मचयार्चे पालन करणे
3. वाणीतील पवित्रता
4. कोणाचाही अपमान न करणे
5. ध्यान आणि मंत्रजप
6. सूर्य आणि चंद्राला अर्घ्य देणे
7. देवी मातेचे भजन-कीर्तन करणे
8. दान आणि सेवा करणे
9. कुमारिका पूजन करणे

# 6 कोटी हुंड्यासाठी मुंबईत विवाहितेचा छळ; पोटातलं बाळही गेलं, सासरच्या चौघांवर गुन्हा दाखल



■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

माहेरून सहा कोटी रुपये आणावेत यासाठी सासरच्या मंडळीने विवाहितेचा मानसिक आणि शारीरिक छळ करून तिचा गर्भपात घडवून आणल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी माहीम पोलिसांनी विवाहितेचा पती, सासू, सासरे आणि नणंद यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये माहीमस्थित लाकडाचे व्यापारी असलेल्या तरुणाशी पीडितेचे लग्न झाले. सासरच्या मंडळीने पीडितेच्या वडिलांकडे २१ लाख रुपये रोख आणि बीएमडब्ल्यू गाडी हुंडा स्वरूपात मागितले होते. मात्र, वडिलांनी ११ लाख रुपये, १६५ तोळे सोने, दोन किलो चांदी आणि एक कार हुंड्यात दिले. तसेच इस्लाम जिमखाना येथे तीन कोटी रुपये खर्च करून थाटात लग्नही लावून दिले. सुरुवातीचे काही दिवस सुरळीत गेल्यानंतर पती, सासू, सासरे आणि घटस्फोटित नणंदेने छळ सुरू केला. पतीच्या व्यवसायवृद्धीसाठी तरुणीने माहेरून सहा कोटी रुपये आणावेत यासाठी तिच्यावर दबाव आणण्यास सुरुवात झाली.

या मागणीसाठी दररोज शिवीगाळ, मारहाण, टोमणे सुरू झाले. दरम्यानच्या काळात तरुणी गर्भवती राहिली. यानंतर तरी छळ कमी होईल वाटले होते मात्र तो आणखी वाढला. पतीसह सर्वांनीच गर्भपात करण्यासाठी तिच्यावर दडपण आणले. पीडितेने प्रतिकार करताच पतीने अमानुष मारहाण केली. पोटात लाथा घातल्या. घरातून बाहेर काढले.मारहाणीमुळे तरुणीचा गर्भपात घडला, असे पोलिसांनी सांगितले. सासरच्या मंडळींनी धडा शिकविण्यासाठी पीडितेच्या माहेरच्यांनी पोलिसांत धाव घेतली.

### पोलिस निरीक्षकाच्या खात्यावर सायबर डल्ला ४९ हजार रुपये वळवले

सायबर चोराने चक्क गुन्हे शाखेतील पोलिस निरीक्षकाच्या बँक खात्यावर डल्ला मारून परस्पर ४९ हजार ५०० रुपये काढून घेतल्याचे प्रकरण समोर आले आहे. या प्रकरणी भायखळा पोलिस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदार गुन्हे शाखेतील विशेष उपक्रमात नियुक्त असून त्यांचे कार्यालय भायखळा परिसरात आहे.

## संपत्तीच्या वादातून वृद्ध व्यावसायिकाला ठार केले

■मुंबई। प्रतिनिधीः

मुंबईच्या कांदिवलीतील चारकोपमध्ये 69 वर्षीय वृद्धाच्या हत्येची खळबळजनक बातमी समोर आली आहे. याप्रकरणी पोलिसांनी मृत वृद्धाचा मुलगा आणि त्यांच्या बिझनेस पार्टनरला अटक केली आहे. कांदिवलीत पश्चिमेत असणाऱ्या वृद्ध व्यावसायिकाच्या कार्यालयातच त्यांचा मृतदेह सापडला आहे. त्यांची रविवारी हत्या झाल्याचे वृत्त इंडियन एक्सप्रेसने पोलिसांच्या हवाल्याने दिली आहे. संपत्ती आणि आर्थिक वादातून ही हत्या झाल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, मृत वृद्धाचा मुलगा आणि त्यांच्या बिझनेश पार्टनरने कथितरित्या गोवंडीतील दोन रहिवाशांना 6.5 लाखांचा एक कंत्राट दिले होते. आणि 1 लाखांची आगाऊ रक्कम देखील दिली होती. यामधूनच वाद झाला असून हत्या करण्यात आल्याचा पोलिसांना संशय आहे. आरोपींमध्ये मुलगा हमीद अय्युब सय्यद (वय 40) आणि सुपारीचा व्यापारी शानु चौधरी (वय 40) या दोघांसह मोहम्मद खैरुल कादीर अली वय 27 यांचा समावेश आहे.पोलिसांनी सांगितले की, शानू आणि हमीदने वृद्ध मोहम्मद यांना महिनभरापूर्वी व्यवसायातून हटवण्याचे ठरवले होते. त्यानंतर शानूने या प्लॅनला तडीस नेण्यासाठी तिसऱ्या व्यक्तीचा शोध सुरु केला.

## ग्रॅच्युईटी थकवल्यामुळे नऊ लाखाचे व्याज द्यावे लागले, मुंबई महापालिकेविरोधात महिलेने दिला न्यायालयीन लढा

■मुंबई। प्रतिनिधीः

मुंबई महानगरपालिकेने एका निवृत्त कर्मचारी महिलेची ग्रॅच्युईटी थकवल्यामुळे तिला आता ग्रॅच्युईटी आणि त्यावर ९ लाख रुपये व्याज द्यावे लागले आहे. या महिलेने महापालिका प्रशासनाविरोधात न्यायालयीन लढा दिला होता व त्यात महिलेच्या बाजूने निकाल लागला. श्रीमंत महानगरपालिकेला या महिलेला व्याजासह ग्रॅच्युईटी द्यावी लागली आहे. या महिलेला १६ लाख रुपये ग्रॅच्युईटी आणि ९ लाखाचे व्याज पालिका प्रशासनाने अदा केले आहे. या प्रकरणामुळे मुंबई महापालिकेतील अन्य कर्मचाऱ्यांनाही दिलासा मिळाला आहे. मुंबई महापालिका सर्वात श्रीमंत महानगरपालिका म्हणून ओळखली जात असली तरी या महापालिकेचा निधी विविध मार्गाने खर्च होत आहे. प्रशासनाच्या ढिसाळ कारभारामुळे अनेक वेळा महापालिकेलाच भुर्दंड सोसावा लागतो. मुंबई महानगरपालिकेच्या निवृत्त मुख्य लिपिक सुजाता जाधव यांची ग्रॅच्युइटीची रक्कम मुंबई महापालिका प्रशासनाने रोखून धरली होती. या महिलेविरोधात एक चौकशी सुरू असल्यामुळे प्रशासनाने त्यांचे निवृत्ती वेतने व ग्रॅच्युईटी अन्य उपदान राखून ठेवले होते. महिलेने निवृत्त झाल्यानंतर सुमारे दहा झ बारा वर्षांनी कामगार न्यायालयात धाव घेतली होती. उच्च न्यायालयाच्या एका निकालाच्या आधारे कामगार न्यायालयाने महिलेच्या बाजूने निकाल दिला. त्यामुळे या महिलेला ग्रॅच्युईटी व त्यावर व्याज देण्याचा आदेश न्यायालयाने दिला होता. त्यानुसार या महिलेला १६ लाख रुपये ग्रॅच्युईटी व त्यावर ९ लाख रुपये व्याज मुंबई महापालिका प्रशासनाने नुकतेच दिले. अधिवक्ता प्रकाश देवदास आणि अधिवक्ता विदुला पाटील यांनी त्यांचा खटला कामगार न्यायालयात नेला. न्यायालयाने त्यांच्या बाजूने युक्तिवाद मान्य केला. निवृत्तीनंतर ३० दिवसांच्या आत ग्रॅच्युइटी न दिल्यास १० टक्के व्याज देणे बंधनकारक आहे आणि प्रलंबित चौकशीमुळे ती थांबवता येणार नाही. न्यायालयाच्या आदेशानुसार जाधव यांना आता १० टक्के व्याज मिळाले असून ते नऊ



लाख रुपये इतके आहे. एखाद्या कर्मचाऱ्याविरोधात चौकशी सुरू असली तरी त्याची अन्य देणी थांबवता येतात, पण ग्रॅच्युईटी थांबवता येत नाही. या मुद्द्यावर त्यांना न्याय मिळाल्याची माहिती प्रकाश देवदास यांनी दिली. याप्रकरणात महिलेला न्याय मिळाला असला तरी व्याजाची जी रक्कम महापालिकेच्या तिजोरीतून दिली.

## औषधसेवा देणारे फार्मसिस्ट न्यायाच्या प्रतिक्षेत!

■मुंबई। प्रतिनिधीः

औषधोपचार ही आरोग्य व्यवस्थेची कणा असली तरी त्या कण्याला आधार देणाऱ्या फार्मासिस्टांचा प्रश्न मात्र कायम दुर्लक्षित आहे. जागतिक फार्मासिस्ट दिन (२५ सप्टेंबर) साजरा होत असताना महाराष्ट्रातील हजारो फार्मासिस्ट पगार, सेवा अटी, नोकरीची सुरक्षितता आणि व्यावसायिक मान्यता या मागण्यांसाठी झगडत आहेत. राज्यात सध्या ४.८ लाख परवाना प्राप्त फार्मासिस्ट असून जवळपास १.२० लाख औषधांची दुकाने आहेत. याशिवाय मोठ्या प्रमाणात फार्मासिस्ट थेट सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेत काम करतात. राज्यात एकूण १००० फामार्सी महाविद्यालये आहेत. एवढा मोठा पसारा तसेच औषध



वाटपाची जबाबदारी असलेल्या फार्मस्टिस्ट आजही आपल्या भविष्याविषयी चाचपडत आहेत.करोना काळात आरोग्य विभागाच्या रुग्णालयांत दिवस-रात्र सेवा देऊनही फार्मासिस्टांना फ्रंटलाइन वॉरिअर म्हणून मान्यता न मिळाल्याने त्यांच्यातील संतापाची भावना आजही दिसत आहे. औषध वाटप, रुग्णांना योग्य मार्गदर्शन, दुष्परिणामांबाबत सतर्कता आणि गुणवत्तायुक्त औषधे उपलब्ध करून देणे ही त्यांची जबाबदारी असली तरी, प्रत्यक्षात त्यांना केवळ औषध वाटप करणारे कर्मचारी म्हणूनच ओळखले जातात. सार्वजनिक आरोग्य यंत्रणेत कार्यरत असलेल्या अनेक फार्मासिस्टांना कंत्राटी पद्धतीने नोकरी देण्यात येते. पदोन्नतीची संधी, निश्चित वेतनमान आणि निवृत्तीवेतनाच्या सुविधांचा अभाव असल्यामुळे हा वर्ग नाराज आहे. औषधसाठा वेळेवर न मिळाल्यास सर्वाधिक रोष हा औषध वितरण काउंटरवर कार्यरत फार्मासिस्टांवरच ओढवतो. ग्रामीण भागात तर 'औषध नाही' हा शब्द उच्चारताच त्यांच्यावरच सारा राग काढला जातो. सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेत खरतर फार्मासिस्टची भूमिका अत्यंत महत्वाची असणे अपेक्षित आहे. मात्र पदवीधर फार्मासिस्टांना आरोग्य व्यवस्थेत समुपदेशन, उपचार मार्गदर्शन किंवा औषध गुणवत्ता नियंत्रण यामध्ये थेट भूमिका मिळत नाही. बाहेरील अनेक देशात फार्मसिस्टचे महत्व मोठे आहे. तेथे ही मंडळी रक्तदाब तसेच शुगर तपासतात, असे प्राचार्य मंजिरी घरत यांनी सांगितले. खरतर आपल्याकडे प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये फर्मासिस्ट हा कणा असला पाहिजे, पण त्याबाबत कोणतीही ठोस भूमिका आरोग्य व्यवस्थेतील उच्चपदस्थ घेताना दिसत नाहीत. राज्यातील सर्व औषधविक्री दुकानांमध्ये फार्मसिस्ट नेमणे आवश्यक असल्याचेही प्राचार्य मंजिरी घरत यांनी सांगितले.

## चारही मेट्रो मार्गिकांवर आता एकच तिकीट, एमएमओपीएलकडून 'वन तिकीट' ॲप कार्यान्वित



■मुंबई। प्रतिनिधीः

मुंबईत सध्या चार मेट्रो मार्गिका वाहतूक सेवेत दाखल असून या मार्गिकांवर प्रवास करणाऱ्या प्रवाशांचा प्रवास आता आणखी सुकर होणार आहे. आता एकाच तिकीटावरून चारही मट्रो मार्गिकांमधून प्रवास करता येणार आहे. घाटकोपर - अंधेरी - वर्सोवा मेट्रो १ चे संचलन करणाऱ्या मुंबई मेट्रो वन प्रायव्हेट लिमिटेडने (एमएमओपीएल) वन तिकीट ॲप कार्यान्वित केले आहे.

प्रवाशांना एका वेळी दोन वा त्यापेक्षा अधिक मार्गिकांवरून प्रवास करायचा असल्यास त्यांना या ॲपवरून एकच तिकीट खरेदी करता येणार आहे. येत्या काळात आणखी काही मार्गिका वाहतूक सेवेत दाखल होणार असून या मार्गिकांवरून प्रवास करण्यासाठी या ॲपवर तिकीट उपलब्ध होणार आहे. मेट्रो १ सह दहिसर - अंधेरी पश्चिम मेट्रो २ अ, दहिसर - गुंदवली मेट्रो ७ आणि आरे - आचार्य अत्रे चौक मेट्रो स्थानक भुयारी मेट्रो ४ या चार मेट्रो मार्गिका सेवेत दाखल आहेत. दरवर्षी किमान ५० किमीची मेट्रो मार्गिका वाहतूक सेवेत दाखल करण्याचे उद्दिष्ट राज्य सरकारने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला (एमएमआरडीए) दिले आहे. त्यामुळे सध्या वाहतूक सेवेत असलेले ७० किमीचे मेट्रोचे जाळे येत्या काही वर्षातच २७० किमी आणि पुढे ३३७ किमीवर पोहचणार आहे. प्रत्येक मेट्रो मार्गिका नजीकच्या दुसऱ्या मेट्रो मार्गिकेशी जोडली जाणार आहे. त्यामुळे भविष्यात एका मार्गिकेवरून दुसऱ्या मार्गिकेचा वापर करून प्रवाशांना इच्छितस्थळ गाठाता येणार आहे.

## समृद्धी महामार्गातील कारंजालाड आणि मेहकर येथे सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वित

■मुंबई। प्रतिनिधीः

राज्यातील दळणवळण व्यवस्था मजबूत करण्यासाठी हजारो किमी लांबीचे रस्त्यांचे जाळे विणण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळावर (एमएसआरडीसी) आहे. आता महामंडळ रस्ते तयार करण्याबरोबरच सौरऊर्जा निर्मिती क्षेत्रातही उतरले आहे. नागपूर - मुंबई मसृद्धी महामार्गावरील वाशिम, कारंजालाड आणि बुलढाणा, मेहकर आंतरबदल येथे सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वित केला आहे. या प्रकल्पाद्वारे पाच मेगावॉट वीजनिर्मितीस सुरुवात झाली आहे. मुंबई - नागपूर अंतर केवळ आठ तासात पार करता यावे यासाठी एमएसआरडीसीने ७०१ किमी



लांबीचा समृद्धी महामार्ग बांधला आहे. हा महामार्ग टप्प्याटप्प्याने वाहतूक सेवेत दाखल करण्यात आला असून सध्या संपूर्ण महामार्ग सेवेत दाखल आहे. या महामार्गावरून आतापर्यंत दोन कोटींहून अधिक वाहनांनी प्रवास केला आहे. दरम्यान, या महामार्गालगत कृषी केंद्र, औद्योगिक केंद्र, टाऊनशीपसह सौरऊर्जा प्रकल्प उभारण्याचा निर्णय एमएसआरडीसीने घेतला आहे. त्यानुसार महामार्गालगतच्या काही आंतरबदल मार्गावर २०४ मेगावॅट क्षमतेचा सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी आराखडा तयार करण्यात आला आहे. या आराखड्यानुसार पहिल्या टप्प्यात कारंजालाड आणि मेहकर येथे नऊ मेगावॅट क्षमतेचा सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यात आला आहे. या प्रकल्पाअंतर्गत पाच मेगावॅट वीजनिर्मितीला सोमवारपासून सुरुवात झाल्याची माहिती एमएसआरडीसीकडून देण्यात आली. कारंजालाड येथे ३ मेगावॉट, तर मेहकर येथे दोन मेगावॅट वीजनिर्मिती होणार आहे. एमएसआरडीसीची विशेष उद्देश वाहन कंपनी महासमृद्धी रिन्युएब्ल एनर्जी लिमिटेड आणि महावितरण यांच्या दरम्यान २०२२ मध्ये झालेल्या करारानुसार सौरऊर्जा प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या विजेची विक्री करण्यात येणार आहे. यासाठी मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजना १ अंतर्गत निविदा प्रक्रियेत भाग घेत महामंडळाने प्रति युनिट ३.०५ रुपये दर दिला होता. भविष्यात एमएसआरडीसी सौरऊर्जा निर्मितीसाठीही ओळखली जाणार आहे. महत्त्वाचे म्हणजे पथकर वसुलीव्यक्तिरिक्त उत्पन्नाचा आणखी एक स्त्रोत उपलब्ध झाला आहे.

## रिक्षा चालकाला लुटणारा आरोपी अटकेत, दोन आरोपींचा शोध सुरू




■मुंबई। प्रतिनिधीः

चाकूचा धाक दाखवून तिघांनी एका रिक्षा चालकाचा मोबाइल आणि काही रोख रक्कम लुटल्याची घटना दहा दिवसांपूर्वी चेंबूर परिसरात घडली होती. याबाबत टिळक नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी तपास करून याप्रकरणी एका आरोपीला नवी मुंबई परिसरातून अटक केली असून पोलीस त्याच्या इतर साथीदारांचा शोध घेत आहेत. चेंबूरमधील सिद्धार्थ कॉलनी परिसरात वास्तव्याला असलेले श्रीकृष्ण साव (२८) रिक्षा चालवून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवितात. ते ४ सप्टेंबर रोजी रात्री चेंबूरच्या लोखंडे मार्ग परिसरात प्रवाशांना सोडून घरी जात होते. याचवेळी त्यांच्या रिक्षात तीन अनोळखी इसम बसले. हे तिघे साव यांना एका निर्जनस्थळी घेऊन गेले आणि त्यांचा मोबाइल आणि रोख रक्कम असा एकूण साडेपाच हजारांचा ऐवज लुटून पोबारा केला. रिक्षा चालकाने तात्काळ टिळक नगर पोलीस ठाण्यात जाऊन याबाबत तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. तपासादरम्यान सदर आरोपी गोवंडी परिसरात वास्तव्याला असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी त्यांचा शोध घेण्यास सुरुवात केली. तिघांपैकी एक आरोपी सिद्धार्थ अवचर (२२) नवी मुंबईतील नेरुळ परिसरात येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

## जाहिरात फलक ४०४० फूटच, टेरेसवर बंदी; फलक धोरण राज्यभरात लागू, घाटकोपर होर्डिंग दुर्घटनेतून धडा

■मुंबई। प्रतिनिधीः

घाटकोपर होर्डिंग दुर्घटनेनंतर राज्यात जाहिरात फलकांसाठी एकात्मिक धोरण तयार केले जाणार आहे. हे जाहिरात धोरण ठरवण्यासाठी सरकारने माजी न्या. दिलीप भोसले समिती स्थापन करून त्यांना अहवाल तयार करण्यास सांगितले होते.

या समितीचा अहवाल स्वीकारण्यात आला असून त्यानुसार पुढील कार्यवाही केली जाणार आहे. समितीने मार्गदर्शक तत्त्वे म्हणून २१ मुद्यांची शिफारस केली आहे. यात फलकांचा आकार जास्तीत जास्त ४० फूट बाय ४० फूट असावा, टेरेसवर किंवा कंपाऊड वॉलवर फलक लावू नयेत, असे निर्बंध घालण्यात आले आहेत. पादचाऱ्यांची, वाहतुकीला धोकादायक ठरू नयेत, विशेषतः दिव्यांगाची सुरक्षितता व सोय, रचना, पर्यावरण या अनुषंगानेही समितीने अनेक शिफारशी केल्या आहेत.

समितीने जाहिरात फलकांची नियमित तपासणी करण्याचीही शिफारस केली आहे. अनधिकृत फलकांवरील कारवाईसाठी नोडल यंत्रणा नियुक्त करणे, कारवाईसाठी महापालिका यंत्रणांना संपूर्ण अधिकार असल्याचे अहवालात



नमूद केले आहे. त्याचबरोबर जाहिरातींसाठी परवानगी, दंड किंवा जाहिरात फलक काढून टाकण्याबाबतचे स्पष्ट धोरणही या अहवालानुसार निश्चित केले जाणार आहे. या अहवालावर संबंधित विभागांना एका महिन्याच्या मुदतीत कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

### अंधेरीतील सरदार पटेल नगरचा सामूहिक पुनर्विकास

अंधेरी येथील सरदार वल्लभभाई पटेलमधील वसाहतीमध्ये ४९८ भूखंडांवरील सुमारे ४ हजार ९७३ सदनिकांच्या पुनर्विकासाचा प्रकल्प म्हाडाच्या माध्यमातून राबविण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. या ठिकाणच्या इमारतींचा मुंबई विकास नियंत्रण नियमावलीनुसार पुनर्विकास करण्याचा प्रस्ताव म्हाडाने दिला आहे. एकत्रित- सामूहिक पुनर्विकास केल्यास विविध मूलभूत सुविधा या आधुनिक स्वरूपात उपलब्ध करून देता येणार असून रहिवाश्यांना प्रशस्त घरे देता येणार आहेत. दरम्यान, वसई-विरार शहर महापालिकेला मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल उभारण्यासाठी आचोळे येथील जमीन उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली.

## कामाठीपुरा पुनर्विकासाच्या निविदेला पुन्हा मुदतवाढ, निविदा प्रक्रिया लांबल्याने प्रकल्पही लांबणीवर




■मुंबई। प्रतिनिधीः

म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळाने दक्षिण मुंबईतील कामाठीपुऱ्याच्या पुनर्विकासासाठी जूनपासून निविदा प्रक्रिया सुरू केली आहे. मात्र तीन महिने उलटून गेले तरी ही निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. काही ना काही कारणाने निविदा प्रक्रियेस मुदतवाढ दिली जात आहे. दुरुस्ती मंडळाने आता पुन्हा एकदा या निविदा प्रक्रियेला आठवड्याभराची मुदतवाढ दिली आहे. निविदा प्रक्रिया लांबल्याने प्रकल्पाच्या अंमलबजावणीसही विलंब होत आहे. अंदाजे ३४ एकर जागेवर उभ्या असलेल्या कामाठीपुऱ्यात ४७५ उपकरप्राप्त इमारती असून उपकरप्राप्त नसलेल्या १६३ इमारतींसह पुनर्बांधणी करण्यात आलेल्या १५ इमारती, तसेच पीएमजीपी इमारती आहेत.

तर ५२ इमारती कोसळल्या आहेत. येथे १५ धार्मिकस्थळे असून दोन शाळा, चार सरकारी कार्यालये आणि आठ इतर बांधकामे आहेत. कामाठापुरा येथील ६,०७३ निवासी आणि १,३४२ अनिवासी रहिवासी आहेत.

कामाठीपुरातील सर्व इमारती जुन्या असून १९९० नंतर त्यांची दूरवस्था होण्यास सुरुवात झाली. आता या इमारती दुरुस्तीच्या पलिकडे गेल्या आहेत. त्यामुळे येथील इमारतींचा पुनर्विकास करणे आवश्यक झाल्याने अखेर कामाठीपुऱ्याच्या पुनर्विकासाची जबाबदारी राज्य सरकारने दुरुस्ती मंडळाकडे दिली. त्यानुसार दुरुस्ती मंडळाने आवश्यक ती कार्यवाही करून राज्य सरकारच्या मंजुरीनुसार १२ जून रोजी या प्रकल्पाच्या कामासाठी निविदा प्रसिद्ध केल्या.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com